| | | | |
|---|---|---|---|
| MHNS050038732021 | दाखल दिनांक | : | ०४/१०/२०२१ |
| | नोंदणी दिनांक | : | ०४/१०/२०२१ |
| | न्यायनिर्णय दिनांक | : | १०/०३/२०२६ |
| | कालावधी | : | ०४ **व.** ०५ **म.** ०६ **दि.** |

**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, नाशिकरोड कोर्ट क्र. २ यांचे न्यायालयात**
**पिठासीन न्यायाधीश (एन. के. मेश्राम)**

**संक्षिप्त फौजदारी खटला क्र.२४७५/२०२१**
**CNR No. MHNS050038732021**
**निशाणी क्र. १८**
[गुन्हा रजि. क्र. १६/२०२१
देवळाली कॅम्प पोलिस स्टेशन]

| | | |
|---|---|---|
| **अभियोग पक्ष** | | महाराष्ट्र शासन तर्फे पोलिस ठाणे अधिकारी,<br>देवळाली कॅम्प पोलिस स्टेशन, नाशिक. |
| **अभियोग पक्षातर्फे विधिज्ञ** | | श्रीमती आर. एन. चव्हाण,<br>सहा. सरकारी अभियोक्ता |
| **आरोपी** | | सागर मुन्ना उर्फ मनोहर सोळंखी<br>वय - ३२ वर्षे,<br>रा. - जुनी स्टेशनवाडी, हनुमान मंदिरा जवळ,<br>ता. जि. नाशिक |
| **आरोपी तर्फे विधिज्ञ** | | श्री. जी. टी. कुटे |

| | |
|---|---|
| गुन्हा घडलेली तारीख | १५.०२.२०२१ |
| प्रथम खबर | १६.०२.२०२१ |
| दोषारोप पत्र दाखल तारीख | ३०.०९.२०२१ |
| दोषारोप ठेवलेची तारीख | १३.०७.२०२२ |
| पुरावा सुरु झालेची तारीख | १३.०७.२०२२ |
| न्यायनिर्णय करीता ठेवलेली तारीख | -- |
| न्यायनिर्णय तारीख | १०.०३.२०२६ |
| शिक्षेच्या आदेशाची तारीख, जर असेल तर | -- |

## <u>आरोपीविषयी माहिती</u>

| आरोपी क्र. | आरोपीचे नांव | अटक तारीख | जामिनावर सुटलेची तारीख | आरोपीत गुन्हा | निर्दोष किंवा शिक्षा | ठोठावण्यात आलेली शिक्षा | खटल्या दरम्यान आरोपी बंदिवासात असल्याचा कालावधी फौ.प्र.सं. कलम ४२८ / भा.ना.सु.सं. २०२३ चे कलम ४६८ प्रमाणे |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | सागर मुन्ना उर्फ मनोहर सोळंकी | १६/०२/२०२१ | १६/०२/२०२१ | भारतीय शस्त्र अधि. ४/२५ व म. पो. अधि. १४२ अन्वये | निर्दोष | -- | -- |

## <u>अभियोग/बचाव/न्यायालयीन साक्षीदारांची यादी</u>

**(अ) <u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार</u> -**

| अ.क्र. | साक्षीदाराचे नांव | निशाणी क्र. | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|---|
| १. | संजय मोगल पांडे | ०७ | पंच साक्षीदार |
| २. | नंदलाल गणपत देशमुख | ०९ | फिर्यादी |

**(ब) <u>बचाव पक्षातर्फे साक्षीदार</u> - निरंक**

**(क) <u>न्यायालय तर्फे साक्षीदार</u> – निरंक**

## <u>अभियोग/बचाव/न्यायालय निशाणी क्रमांक</u>

**(अ) <u>अभियोग पक्षातर्फे निशाणी</u> -**

| अ.क्र. | निशाणी क्र. | वर्णन |
|---|---|---|
| १. | १० | तक्रार / फिर्याद |

**(ब) <u>बचाव पक्षातर्फे निशाणी</u> - निरंक**

**(क) <u>न्यायालय पक्षातर्फे निशाणी</u> - निरंक**

**(ड) <u>भौतीक वस्तु</u> - निरंक**

# न्यायनिर्णय
## (घोषित दिनांक :- १०/०३/२०२६)

प्रस्तुतचा खटला हा भारतीय शस्त्र अधिनियम ४/२५ व मुंबई पोलीस अधिनियम १४२ अन्वयेच्या दंडनिय अपराधाकरिता आरोपीविरुध्द चालविण्यात आला.

**अभियोगपक्षाची हकीकत थोडक्यात खालील प्रमाणे-**

**०२.** फिर्यादी नंदलाल गणपत देशमुख हे पोलीस शिपाई असून ते त्यांचे कर्तव्य करित असतांना त्यांना प्राप्त गोपनीय माहितीच्या आधारे ते दि. १५/०२/२०२१ रोजी रात्री १०.३० वाजताचे सुमारास संजयगांधी झोपडपट्टी, जुनी स्टेशनवाडी, देवळाली कॅम्प, ता. जि. नाशिक येथे आरोपी हा संशयास्पद फिरतांना मिळून आल्याने त्याला पकडून त्याची अंगझडती घेतली असता त्याच्या ताब्यात लोखंडी धातूचा कोयता अवैधरित्या बाळगून मा. पोलीस उपआयुक्त नाशिक यांचे कडील हद्दपार आदेशाचे उल्लंघन करुन समक्ष अधिकारी यांची पुर्व परवानगी न घेता विना परवाना आपल्या ताब्यात बाळगून मिळून आला. म्हणून, त्यांनी पोलीस स्टेशन देवळाली कॅम्प येथे आरोपीविरुध्द फिर्याद दिली.

**०३.** सदर फिर्यादीवरुन पोलीस स्टेशन अंमलदार देवळाली कॅम्प, नाशिक यांनी प्रथम गु.र.नं.१६/२०२१ भारतीय शस्त्र अधिनियम ४/२५ व मुंबई पोलीस अधिनियम १४२ अन्वयेच्या अपराधांकरिता गुन्हा नोंदविला. त्यानंतर, आरोपीला अटक केली. तपासी अंमलदार यांनी जप्ती पंचनामा दोन पंचासमक्ष केला. साक्षीदारांचे जबाब नोंदविले आणि तपासाअंती आरोपीविरुध्द पुरावा मिळून आल्याने न्यायालयात दोषारोप पत्र दाखल केले.

**०४.** माझे पूर्व पिठासीन अधिकारी यांनी दि.१३/०७/२०२२ रोजी भारतीय शस्त्र अधिनियम ४/२५ व मुंबई पोलीस अधिनियम १४२ च्या दंडनीय अपराधाकरिता दोषारोप नि.क्र.५ ठेवले. आरोपीने सदर दोषारोप मान्य केले नाही व त्याच्याविरुध्द खटला चालविण्यासाठी मागणी केली.

०५. प्रस्तुत प्रकरणात अभिलेखावर आरोपींविरुध्द कुठलाही पुरावा मिळून न आल्याने आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम ३१३(१)(ब) अन्वये निवेदन नोंदवण्यात आले नाही.

०६. अभियोग पक्षाचे वरील कथन व दस्तऐवजावरील उपलब्ध साक्ष पुराव्यावरुन मी खालील मुद्दे तयार करुन त्यांचे कारणामिमांसेसहीत निष्कर्ष खालील प्रमाणे देत आहे.

| | <u>मुद्दे</u> | <u>निष्कर्ष</u> |
|---|---|---|
| १. | अभियोगपक्ष असे सिद्ध करतो काय की, दि.१५/०२/२०२१ रोजी रात्री १०.३० वाजताचे सुमारास संजयगांधी झोपडपट्टी, जुनी स्टेशनवाडी, देवळाली कॅम्प, ता. जि. नाशिक येथे आरोपी हा संशयास्पद फिरतांना मिळून आल्याने त्याला पकडून त्याची अंगझडती घेतली असता त्याच्या ताब्यात लोखंडी धातूचा कोयता अवैधरित्या बाळगतांना मिळून आला. त्यामुळे भारतीय शस्त्र अधिनियम ४/२५ अन्वये गुन्हा केला? | **नकारार्थी** |
| २. | अभियोगपक्ष असे सिद्ध करतो काय की, वर नमुद तारिख, वेळ व ठिकाणी आरोपी याने मा. पोलीस उपआयुक्त नाशिक यांचे कडील हद्दपार आदेशाचे उल्लंघन केले. त्यामुळे मुंबई पोलीस अधिनियम १४२ अन्वये गुन्हा केला? | **नकारार्थी** |
| ३. | आदेश काय ? | **आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात येते** |

## <u>कारणमिसांसा</u>

०७. अभियोगपक्षाने आरोपी विरुध्दचा गुन्हा सिध्द करण्यासाठी सा.क्र.१ संजय मोगल पांडे व सा.क्र.२ फिर्यादी नंदलाल गणपत देशमुख यांची साक्ष नोंदविली.

**<u>मुद्दा क्र. १ व २ करिता -</u>**

०८. आरोपीविरुद्धचा दोषारोप सिद्ध करण्यासाठी अभियोगपक्षाला हे सिद्ध करण्याचे गरजेचे आहे की,

(अ) आरोपीकडून जप्त केल्याचा दावा करण्यात आलेली वस्तू ही संबंधित कायद्यान्वये “शस्त्र” या संज्ञेत मोडते,

(ब) ती वस्तू आरोपीच्या जाणीवपूर्वक व बेकायदेशीर ताब्यात होती, आणि

(क) आरोपीकडे ती बाळगण्यासाठी आवश्यक असा वैध परवाना अथवा कायदेशीर अधिकार नव्हता.

फौजदारी खटल्यात अभियोगपक्षाने आपला आरोप संशयापलीकडे जाऊन सिद्ध करणे आवश्यक असते.

०९. सा.क्र.१ संजय मोगल पांडे यांची साक्ष पाहता, ते जप्ती पंचनाम्यावरील पंच साक्षीदार असले तरी त्यांनी त्यांच्या सरतपासात केवळ पंचनाम्यावरील सही आपली असल्याचे मान्य केले आहे. परंतु, पंचनाम्यातील मजकूर त्यांना माहिती नसल्याचे स्पष्टपणे सांगितले आहे. पुढे त्यांनी पोलीसांसोबत स्टेशनवाडी येथे गेले नसल्याचेही नमूद केले आहे. अभियोगपक्षाने त्यांना प्रतिकूल घोषित करून उलटतपासणी केली असता देखील त्यांनी घटनास्थळी पंचनाम्यासाठी गेले नसल्याचेच सांगितले. तसेच आरोपीची अंगझडती त्यांच्या समक्ष घेण्यात आली, आरोपीच्या ताब्यातून कोयता मिळून आला आणि त्या अनुषंगाने पंचनामा त्यांच्या उपस्थितीत करण्यात आला, ही बाब त्यांनी स्पष्ट शब्दांत नाकारली आहे. त्यामुळे जप्ती पंचनाम्याचा मूळ गाभाच या साक्षीदारामार्फत सिद्ध होत नाही.

१०. सा.क्र.२ नंदलाल गणपत देशमुख हे फिर्यादी व पोलीस कर्मचारी असून त्यांनी त्यांच्या सरतपासात असे म्हटले आहे की, दि.१५/०२/२०२१ रोजी त्यांना गुप्त माहितीगारामार्फत माहिती मिळाली की आरोपी स्टेशनवाडी येथील वडाच्या झाडाजवळ बसलेला आहे. त्यांनी सदर माहिती उपनिरीक्षकास कळवून पंचासह त्या ठिकाणी भेट दिली व तेथे आरोपी मिळून आल्यावर त्याची अंगझडती

घेतली असता त्याच्या ताब्यातून कोयता आढळून आला, असे ते म्हणतात. त्यानंतर आरोपीस पोलीस ठाण्यात आणून त्यांनी फिर्याद दिल्याचे ते सांगतात.

**११.** मात्र, त्यांच्या उलटतपासात काही महत्त्वपूर्ण त्रुटी समोर येतात. त्यांनी स्वतः मान्य केले आहे की, गुप्त बातमीची नोंद सामान्यतः स्टेशन डायरीत घेतली जाते. परंतु, सदर प्रकरणात त्यांनी स्वतः अशी नोंद केली नाही. पुढे त्यांनी हेही मान्य केले की, नि.क्र.१० फिर्यादीत दिनांक १५/०२/२०२१ संदर्भात खाडाखोड आहे. तसेच, त्यांच्या फिर्यादीत पंचांची नावे नमूद नाहीत, ही बाबही त्यांनी मान्य केली आहे. या बाबी त्यांच्या साक्षीच्या विश्वसनीयतेवर परिणाम करतात.

**१२.** जप्ती पंचनामा हा अभियोगपक्षाच्या प्रकरणातील अत्यंत महत्त्वाचा दस्तऐवज आहे, कारण आरोपीच्या ताब्यातून शस्त्रसदृश वस्तू प्रत्यक्ष जप्त झाल्याचा मुख्य आधार त्यावरच अवलंबून आहे. अशा परिस्थितीत, स्वतंत्र पंच साक्षीदाराकडून जप्तीची कार्यवाही सिद्ध होणे अपेक्षित असते. परंतु, प्रस्तुत प्रकरणात पंच साक्षीदारानेच जप्तीची संपूर्ण कार्यवाही नाकारल्याने जप्ती पंचनाम्याची पुराव्यात्मक किंमत मोठ्या प्रमाणावर कमी होते.

**१३.** हे खरे आहे की, केवळ या कारणावरून पोलीस साक्षीदाराची साक्ष कायद्याने अपात्र ठरत नाही. तथापि, जेव्हा संपूर्ण प्रकरणाचा पाया जप्ती व ताबा यांसारख्या मूलभूत बाबींवर उभा असतो आणि त्या बाबींना स्वतंत्र पुष्टी मिळत नाही, तेव्हा पोलीस साक्षीचे परीक्षण अधिक दक्षतेने करणे आवश्यक ठरते. प्रस्तुत प्रकरणात सा.क्र.२ हेच जप्तीबाबतचे मुख्य साक्षीदार आहेत. परंतु, त्यांच्या साक्षीस स्वतंत्र, विश्वासार्ह आणि निर्विवाद पुष्टी उपलब्ध नाही.

**१४.** याशिवाय, अभियोगपक्षाने तपासी अधिकारी साक्षीस पाचारण केलेला नाही. तपास कसा झाला, गुप्त माहितीची नोंद का करण्यात आली नाही, जप्तीची प्रक्रिया कशी पार पडली, जप्त मालाची सुरक्षित श्रृंखला कशी राखली गेली,

तसेच प्रकरणातील कागदोपत्री त्रुटींचे स्पष्टीकरण काय आहे, या सर्व बाबींवर प्रकाश टाकण्यासाठी तपासी अधिकाऱ्याची साक्ष महत्त्वाची होती. त्या साक्षीअभावी, अभियोगपक्षाच्या कथनातील उणिवा दूर होत नाहीत.

**१५.** अभियोगपक्षाने आरोपी त्या विशिष्ट ठिकाणी प्रत्यक्ष आढळून आला, असा दावा केला आहे. तसेच, आरोपी त्या वेळी हद्दपारी आदेशाच्या अंमलाखाली त्या क्षेत्रात उपस्थित होता, असेही सूचित केले आहे. अशा स्थितीत, आरोपीच्या उपस्थितीबाबत घटनास्थळ पंचनामा, स्वतंत्र साक्षी, किंवा अन्य तांत्रिक / भौतिक पुरावा अपेक्षित होता. परंतु, अशा स्वरूपाचा पुरावा अभिलेखावर आणलेला नाही. घटनास्थळाजवळील सीसीटीव्ही फुटेज, अन्य स्वतंत्र प्रत्यक्षदर्शी, किंवा आरोपी तेथे होता याची खात्री देणारा कोणताही विश्वासार्ह पुरावा सादर केलेला नाही.

**१६.** पुढे, अभिलेखावर असलेली आदेशाची प्रत ही छायांकित प्रत असल्याचे दिसते. मूळ नोंद अथवा कायदेशीररीत्या सिद्ध केलेली प्रत अभिलेखावर नसल्यामुळे त्या दस्तऐवजावर पूर्ण प्रमाणिकतेने अवलंबून राहणे कठीण जाते. फौजदारी खटल्यात दोषारोप सिद्ध करण्यासाठी सादर केलेला दस्तऐवजी पुरावा देखील विधिसंगतरीत्या सिद्ध होणे आवश्यक असते.

**१७.** एकूण पुराव्याचे एकत्रित मूल्यमापन करता असे दिसते की, जप्ती पंचनामा स्वतंत्र पंच साक्षीदारामार्फत सिद्ध झालेला नाही, फिर्यादी पोलीस साक्षीदाराच्या कथनात भौतिक व कागदोपत्री त्रुटी आहेत, गुप्त माहितीच्या नोंदीबाबत नियमित प्रक्रिया पाळल्याचे दिसून येत नाही, तपासी अधिकाऱ्याची साक्ष नोंदविण्यात आलेली नाही, आरोपीच्या ताब्यातून शस्त्र जप्त झाल्याची बाब स्वतंत्र व निर्विवाद पुराव्याने पुष्टीत होत नाही, दस्तऐवजी पुरावा देखील पूर्णपणे सिद्ध झालेला नाही. या सर्व परिस्थितीत, अभियोगपक्षाची कथा संशयरहित व अखंड स्वरूपात सिद्ध होत नाही. फौजदारी न्यायशास्त्रानुसार, जेव्हा दोन शक्यता संभवतात आणि त्यापैकी एक आरोपीच्या निरपराधित्वाशी सुसंगत असते, तेव्हा त्या शंकेचा लाभ आरोपीस देणे आवश्यक ठरते.

**१८.** म्हणून, केवळ अपुष्ट पोलीस साक्षीवर आणि विधिसंगतरीत्या सिद्ध न झालेल्या जप्तीवर आधारित राहून आरोपीविरुद्धचा दोषारोप संशयापलीकडे जाऊन सिद्ध झाला आहे, असे म्हणणे सुरक्षित ठरणार नाही. परिणामी, अभियोगपक्ष आरोपीविरुद्धचा आरोप सिद्ध करण्यात अपयशी ठरला आहे.

**१९.** म्हणून मी मुद्दा क्र. १ व २ यांची उत्तरे नकारार्थी देतो व पुढीलप्रमाणे आदेश पारित करतो.

## आदेश

१) आरोपी सागर मुन्ना उर्फ मनोहर सोळंकी याची भारतीय शस्त्र अधिनियम ४/२५ व मुंबई पोलीस अधिनियम १४२ या शिक्षापात्र गुन्ह्यातून फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २५५(१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे

२) आरोपीचे जामीनपत्र व बंधपत्र पुढील सहा महिन्यांकरिता कायम करण्यात येते.

३) प्रस्तुत प्रकरणातील जप्त मुद्देमाल हा योग्य त्या विल्हेवाटीकरिता जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक यांच्याकडे पाठविण्यात यावा.

(न्यायनिर्णय हा खुल्या न्यायकक्षामध्ये घोषीत करण्यात आला.)

NANA KESHAV MESHRAM
Digitally signed by NANA KESHAV MESHRAM
Date: 2026.03.17 18:40:09 +0530

दिनांक: १०/०३/२०२६
स्थळ: नाशिकरोड

**(एन. के. मेश्राम)**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
न्यायालय क्र. २ नाशिकरोड,
ता. जि. नाशिक